प्रदूषण बोर्डाद्वारे कारवाई करण्यात येवू शकते. त्यासाठी तीन महिने कारावास व 10,000 रूपये दंड अशी शिक्षा सुनावली जाऊ शकते. हा गुन्हा परत केल्यास दर दिवशी 5000 रूपये दंडाची शिक्षा ठोठावली जाऊ शकते.

**वन्यजीव संरक्षण कायदा – 1972**

या कायद्याद्वारे राष्ट्रीये उद्याने व वन्यजीव अभयारण्यांची घोषणा करण्यात येऊन त्यासंबंधी आदेश काढण्यात आले. या कायद्यातील 1 ते 4 या परिशिष्टात अंतर्भूत असलेल्या सर्व प्राण्याच्या व वन्यजीवांच्या शिकारीवर संपूर्ण बंदी घालण्यात आली. या कायद्यांतर्गत वनस्पतींचा अंतर्भाव सुरक्षित वनस्पती म्हणून करण्यात आला आहे. या कायद्यातील 2002 साली करण्यात आलेल्या सुधारणा अधिक कडक आहेत. या कायद्यात मूलभूत बदल करण्यात आले असले तरी या कायद्याच्या अमलबजावणीबाबत समस्या कायम आहेत. या कायद्यातील परिशिष्ट 1 किंवा परिशिष्ट 2 मधील आपल्या भागात अंतर्भूत करण्यात आलेल्या प्राण्यांची अवैध शिकार, त्यांच्या मांसाचा वापर, तसेच प्राण्यापासून भेटवस्तूंची निर्मिती करणे या गुन्हयासाठी एक वर्ष वा अधिक व जास्तीत जास्त दहा वर्ष कारावास व 20000 रूपये दंडाची शिक्षा सुनावली जाऊ शकते.

**प्रदूषणाचा स्तर धोकादायक**

शहरातील हवा दिवसेंदिवस प्रदूषित होत आहे असे केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) यांच्या नोंदीद्वारे नागपूर शहराच्या स्थितीचे अवलोकन करता येते. वरील मंडळाने उन्हाळयामध्ये घेतलेल्या नोंदी धक्कादायक आहेत. त्यापैकी एप्रिल महिन्यातील 30 दिवसांपैकी 17 दिवस आणि मे महिन्यात तब्बल 21 दिवस शहराच्या प्रदूषणाने धोक्याचा स्तर पार केला. उन्हाळयामध्ये तीन–चार उष्ण लहरींनी नागपूरकराच्या नाकी नऊ आणून सोडले. सोबतच प्रदूषणाचा मारही त्यांना सोसावा लागत आहे. कोरोनातून जनजिवन सावरले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत प्रदूषणाची पातळी वाढली आहे. वाढलेली वाहतूक व मोठया प्रमाणात सुरू असलेल्या बांधकामासाठी धुलिकणांचे प्रदूषण देखील वाढले आहे. मे महिना 2022 मध्ये 29 दिवसात 21 दिवस प्रदूषणाचा स्तर उंच्चाकीवर होता. यातील 3 दिवस अतिप्रदूषित आणि केवळ दोन दिवस स्थिती चांगली होती. हवेच्या इंडेक्सनुसार 8 ते 50 एक्युआय असणे म्हणजे चांगली स्थिती. 50 ते 100 एक्यूआय असणे म्हणजे आजारी व संवेदनशील लोकांसाठी वाईट असते. याबद्दलचा अहवाल अहवाल दिनांक 30/5/2022 च्या लोकमत नागपूरच्या हॅलो नागपूरमध्ये प्रकाशित केलेला आहे. तेव्हा प्रदूषण कशी सामाजिक समस्या ठरत आहे, हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष**

पर्यावरण चांगले ठेवण्याकरिता आज वृक्ष लागवड होणे अत्यंत आवश्यक आहे. पाण्याचा योग्य प्रकारे वापर होणे अतिशय महत्वपूर्ण आहे. मानव प्राण्याकडून असे कोणतेही कृत्य घडू नये की, ज्यामुळे नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीची हानी होईल याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणातून ज्या सामाजिक स्वरूपाची समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या दूर करण्याची जबाबदारी आपलीच समजून त्या प्रमाणे आपला जिवनस्तर बदलून सुंदर आणि स्वच्छ पर्यावरणवादी होण्याची आज अत्यंत आवश्यकता आहे. तेव्हाच या देशाला आपण स्वच्छ आणि सुंदर म्हणू शकतो. तेव्हा आजपासून आपला हाच संकल्प असावा असे मला वाटते.

**संदर्भ**

1. *अग्रवाल, सत्येन्द्र. (2012). पर्यावरण और प्रदूषण. जयपूर : इशिका पब्लिशिंग हाऊस*
2. *चोपने, सुरेश. (30 मे 2022). चिंताजनक नागपूरने 'मे' मध्ये 21 दिवस पार केला प्रदुषणाच्या धोक्याचा स्तर. नागपूर : दै. लोकमत*
3. *घारपुरे, विठ्ठल. (2007). पर्यावरणशास्त्र. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स*
4. *तिवारी, विजयकुमार. (2004). पर्यावरण अध्ययन. हैदराबाद : हिमालया पब्लिशिंग हाऊस*
5. *भरूचा, एरक व बर्वे, सिध्दीविनायक. (2007). पर्यावरणशास्त्र. मुंबई : ओरिएंट हॉगमन प्रा.लि.*

6- *Sinha, S., Shukla, M., & Shukla, R. (2008). Environmental Studies. Delhi: AITBS Publishers*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

January-June 2022- Vol. 11 No. 1

# महिलांचे उद्धारकर्ते समाज सुधारक

**डॉ. नलिनी बोरकर**

*समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,*
*पे.पं., जवाहरनगर जि. भंडारा.*

प्रस्तावनाः

*भारतीय परंपरागत समाजात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान नाही. त्यामागे स्त्री–जगताशी जुळलेले अनेक प्राचीन संदर्भ आहेत. त्यांचे अध्ययन केल्याशिवाय आजच्या स्त्रीयांचे पतन कसे घडून आले ? हे समजून घेणे अशक्य आहे. या लेखाचा उद्देश प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत स्त्रियांचे जीवन कसे बदलत गेले, त्याचा आढावा घेणे, त्यामागील कारणमीमांसा करणे आणि आधुनिक युगातील सशक्त स्त्रियांच्या पुनर्निर्माण प्रक्रियेचे प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे सिद्ध करणे हा आहे. या लेखाच्या बांधनीकरिता दुय्यम स्त्रोत म्हणून विविध मासिके, वर्तमानपत्रे, वैचारिक लेख, इंटरनेट वरील माहिती यांचा आधार घेण्यात आलेला आहे. या विषयावर वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकातील माहितीचा वापर करून या लेखातील साहित्यासामुग्रीची निर्मिती करण्यात आली आहे.*

**प्राचीन काळ ते आधुनिक काळापर्यंतचा स्त्री चा प्रवासः**

भारतातील वेदांच्या अध्ययनात अथर्ववेदात असा स्पष्ट उल्लेख आढळतो कि, स्त्रियांना सुद्धा प्राचीन काळी उपनयन संस्कार करण्याचा अधिकार होता. स्त्रिया वेदाभ्यास करू शकत होत्या, वेदांचे अध्ययन करण्याचा अधिकार त्यांना होता. स्त्रिया गुरुकुलात जात होत्या आणि ब्रम्हचर्य धारण करून शिक्षण घेत होत्या असा उल्लेख पाणिनीच्या लेखनात आढळतो, तर पतंजलीच्या महाभाष्यामध्ये म्हटले आहे की, स्त्रिया त्या काळी शिक्षिका होत्या आणि त्या इतर लहान मुलींना वेदांचे अध्ययन करण्यास शिकवीत असत. त्या काळात धर्म, अध्यात्म, तात्विक कारणमीमांसा, शास्त्रोक्त महाचर्चा अशा कठीण विषयामध्ये सुद्धा पुरुषांच्या सोबतीने स्त्रियांचा सहभाग असल्याची उदाहरणे आढळून येतात. जनक आणि सुलभ, याज्ञवलक्य आणि गार्गी, याज्ञवलक्य आणि मैत्रेयी, शंकराचार्य आणि विद्याधरी यांच्यामधील सार्वजनिक विवादाच्या चर्चावरून हे स्पष्ट होते. असा प्राचीन भारतीय स्त्रियांचा इतिहास असतांना स्त्रियांचे अवमूल्यन कसे व कोणी केले, तिचे महत्व नाकारून तिला हीन–दिन कोणी बनविले असावे, त्यामागील करणे काय असावीत ?

पाषाणयुगात मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. टोळ्यांची नावे स्त्रीयांवरून असायची, स्त्रिया याच त्या टोळीच्या कर्त्या–धर्त्या असायच्या. वारसाहक्क सुद्धा स्त्रियांकडून मुलींकडे सुपूर्द केला जात असे. स्त्रिया आपल्या सारख्या नवीन जीवांना जन्म देवू शकतात या त्यांच्या जैविक गुणांची खूप प्रसंशा आणि महती गायली जायची त्यासाठी त्यांना 'मातृ देवो भवः' म्हणून पूजले जायचे. पुढील काळात श्रमविभाजनाचा सिद्धांत लिंगावर आधारित राबवून पुरुषांनी त्यांची शारीरिक शक्ती स्त्रियांपेक्षा जास्त आहे हे कारण दाखवून तिला 'चूल आणि मूल' या पुरते मर्यादित केले. तिने मुलांचा सांभाळ करावा आणि घरांच्या चार भिंतीत बंदिस्त राहावे अशी कायमची सोय पुरुषी वर्चस्वाने केली. परंतु हि फरफट पुढील पिढ्यांना बरबाद करू नये म्हणून त्याही परिस्थितीत स्त्रीयांनी कंबर कसली आणि त्यांनी लढा दिल्याची उदाहरणे सापडतात.

प्राचीन काळातील मातृसत्ताक पद्धती भारतातच नव्हे तर सर्वदूर ईजीप्त पर्यंत प्रचलित झालेली आढळून येते. हि प्रथा भारतातील 'नागवंशीय' लोकांमध्ये अधिक रूढ होती. या प्रथेचे कारण स्त्रीला भूस्वामिनी, भूमिकन्या, भूमातेची अधिपती मानले जात होते म्हणून सम्राज्ञीचा अधिकार स्त्रियांकडे होता. (महेंद्र गायकवाड, 2018, पृष्ठ 6) बुद्धकाळात बुद्धांच्या उपदेशाने स्त्रिया अर्हत पदाला पोहचल्याची उदाहरणे आहेत. तथागतांनी स्त्रियांना दीक्षा घेण्याचा अधिकार बहाल केला आणि त्यांच्यासाठी भिखुनिसंघाची स्थापना केली. निर्वाण प्राप्त करण्याच्या मार्गात 'स्त्री' किंवा 'पुरुष' असा कोणताच लिंगभेद बुद्धांनी मानला नाही. भारतीय संस्कृतीत बौद्ध काळ हा स्त्रियांच्या प्रगतीचा सुवर्ण काळ होता. स्त्रियांचे जीवन उच्च पदाला पोहचले होते. बुद्धांचे तत्वज्ञान स्त्रियांना आचार–विचारांची स्वतंत्रता बहाल करून त्यांना समानतेची वागणूक बहाल करणारे होते. बौद्ध काळात 'इत्थिभी पंडिता होन्ति' हे वचन स्त्रियांनी आपल्या आयुष्यात उतरविले होते. बुद्धांचा स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा विचार स्त्रियांच्या उत्थानासाठी उपयोगी होता. रोमन राज्यात स्त्रीला प्रतिष्ठेचे स्थान देण्यात आले होते, तिला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. प्लेटो आणि ॲरीस्टॉटल या महान तत्वज्ञांनी सुद्धा स्त्रीला पुरुषांच्या तुलनेत समान मानले. पुरुष आणि स्त्री मध्ये स्वभावात फरक नसतो असे प्लेटो म्हणत असे. मोहम्मद पैगंबर यांनी सुद्धा पुरुषांना म्हटले होते कि तुमचा स्त्रियांवर अधिकार आहे तसा स्त्रियांचाही तुमच्यावर आहे. एकूणच प्राचीन काळाचा इतिहास बघता सर्व महान विभूतींनी स्त्रियांना दुय्यम कधीच मानले नाही.

परंतु सनातनी हिंदू धर्माचा उदय झाला आणि स्त्रियांच्या स्थानाला उतरती कळा लागली. 'स्त्री नरक का द्वार है', 'ढोर गवार पशु नारी, सब ताडन के अधिकारी' असे विचार जाणीवपूर्वक हिंदू धर्मात रुजविले गेले. पुरुषी अहंकाराने स्त्रियांना विषमतेच्या खोल दरीत लोटून दिले. समानता तर सोडाच परंतु तिचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार सुद्धा 'मनुस्मुर्ती' नावाच्या विखारी ग्रंथाने हिसकावून घेतला होता. स्त्रिया या चंचल प्रवृत्तीच्या असतात म्हणून, बालपणी बापाने, तरुणपणी नवऱ्याने आणि म्हातारपणी मुलाने तिला

बंधनात ठेवावे असा फतवाच संस्कृतीच्या नावावर काढण्यात आला होता.

कौटुंबिक जबाबदारी सारख्या प्रमाणात पेलूनही दिवसेंदिवस स्त्रियांची वाताहत होतच गेली. शैक्षणिक अधोगती, धार्मिकतेच्या जोखडात अडकवून त्यांना मुलांचे प्रश्न, तरुण मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न, नवऱ्याची व्यसनाधीनता, दारिद्रय, चारीत्र्यसंवर्धन अशा अनेक आव्हानांना तोंड देत जगणे वाट्याला आले होते. स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा जास्त गुणात्मक बदल घडवून आणू शकतात. एक स्त्री सुसंस्कृत झाली तर संपूर्ण पिढी उद्धरते परंतु परंपरेने त्यांना दुबळे बनवले होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयापूर्वी ची स्त्रियांची स्थिती सुधारासाठी झालेले प्रयत्नः**

भारतामध्ये स्त्रीमुक्तीच्या आंदोलनात अनेक थोर महापुरुषांनी कार्य केले. त्यातील काही निवडक समाजसुधारक इतिहासाच्या पानांवर अजरामर झालेत. त्यापैकी राजाराममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महादेव गोविंद रानडे, महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची नावे अग्रगण्य आहेत. स्त्रीमुक्तीच्या चळवळीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर होता. स्त्री मुक्तीच्या प्रगतीची दारे महात्मा फुल्यांनी उघडली होती. त्यासोबतच लोकहितवादी आगरकर, रानडे, महर्षी कर्वे आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पर्यंतचा एक सेतूच निर्माण झाला होता.

**राजा राममोहन रॉयः**

स्त्रियांच्या अधोगतीमध्ये परंपरा आणि धार्मिक रीतीरिवाज यांचा फार मोठा अडथळा आहे हे राजा राममोहन रॉय यांना समजले त्यामुळे त्यांनी स्त्रियांना शिक्षित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा यावर भर दिला. शिकलेल्या स्त्रिया समाजातील कुप्रथा आणि त्यांच्यावरील अन्यायाला दूर सारू शकतात असा त्यांचा विचार होता. त्यासाठी त्यांनी 1822 मध्ये एक ग्रंथ प्रकाशित केला ज्यामध्ये स्त्रियांच्या अधिकाराबाबत विवेचन होते. बंगाल मधील बाल विधवांना सती प्रथेसारख्या अमानुष प्रथेच्या नावावर जिवंतपणी जाळले जात होते. या विरुद्ध राजा राममोहन रॉय यांनी बंड पुकारले. 1818 मध्ये त्यांनी सती प्रथेविरुद्ध आवाज उठविला आणि शासनदरबारी हि प्रथा बंद व्हावी हि मागणी उचलून धरली. त्यामुळे 1929 मध्ये लॉर्ड विलियम बैन्टिक यांनी हि प्रथा अवैध घोषित केली. बहुपत्नीप्रथा, अंगवस्त्र किंवा रखैल ठेवण्याच्या प्रथेचा राजा राममोहन रॉय यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या या प्रथांच्या विरुद्ध शासनदरबारी जोरदार प्रदर्शन केले. त्यांच्या प्रयत्नामुळे सती प्रथे विरुद्ध कायद्याची निर्मिती झाली. मृत पतीच्या संपत्तीमध्ये पत्नीच्या अधिकाराचा प्रश्न सुद्धा त्यांनी समाजासमोर मांडला. 20 ऑगस्ट 1828 मध्ये 'ब्राम्हो समाजाची' स्थापना करून राजा राममोहन रॉय यांनी रूढीवादी अंधविश्वास आणि सामाजिक सुधारणेच्या आंदोलनात स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांच्या शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे यावर भर दिला. सतीप्रथा नष्ट करणे. बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहास प्रोत्साहन देणे, आंतरजातीय विवाहास मान्यता देणे इत्यादी कार्याच्या यशस्वीतेसाठी 1892 मध्ये 'ब्रम्ह मेरेज कायदा' तयार करून तो पारित करण्यावर भर दिला. त्यामुळे स्त्रियांच्या समस्यांच्या संदर्भात राजा राममोहन रॉय यांच्या कार्याची दखल घेणे आवश्यक ठरते.

स्वामी दयानंद सरस्वतीः स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'आर्य समाजाची' स्थापना केली आणि स्त्रियांच्या शिक्षणाच्या संदर्भात महत्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांच्या शिक्षणात जातीभेद आणि वर्णभेद अमान्य केला. त्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. शुद्र स्त्रियांनी धर्मग्रंथ वाचू नये या गोष्टीचा त्यांनी भरपूर विरोध केला. त्यांनी वेदांच्या आधारे हे सिद्ध केले होते की, शूद्रांना वेदाध्ययन करण्याचा अधिकार आहे. वेद ईश्वराने निर्माण केले तर त्यांचे अध्ययन करण्यात भेदाभेद कसा असू शकेल असे त्यांचे मत होते म्हणून स्त्रिया वेदाभ्यास करू शकतात हे त्या काळातील क्रांतिकारी पावूल त्यांनी उचलले होते.

पारंपारिक वैदिक विचारांना फाटा देत त्यांनी बहुविवाह प्रथेचा विरोध केला होता आणि एकविवाह हा सर्वोत्कृष्ट मानला होता. विवाहाची स्वयंवर हि प्रथा त्यांना अधिक मान्य होती कारण यात मुलीना वर निवडण्याचा अधिकार असतो, बालविवाहाला मात्र त्यांचा विरोध होता. मात्र वर्गव्यवस्थे च्या आधारे आंतरजातीय विवाहास त्यांनी मान्यता देवून तत्कालीन समाजात खळबळ उडवून दिली होती. पुनर्विवाहास त्यांनी विशेष परिस्थिती मध्ये मान्यता प्रदान केली होती. पहिली पत्नी वा पती जिवंत असेल तर विशेष परिस्थिती मध्येच पुनर्विवाहाची मान्यता त्यांनी दिली होती. ज्या स्त्रीचा विवाह झाला असेल परंतु स्त्री–पुरुष मिलन झाले नसेल अशा स्त्री व पुरुषास दुसरा विवाह करता येईल असे ते म्हणतात. ब्राम्हण विधवांच्या संदर्भातही त्यांची मते परखड होती, ते म्हणतात, ब्राम्हण विधवा जर उर्वरित जीवन ब्रम्हचर्य धारण करून घालवू इच्छित असेल तर ठीक आहे. तिला जर अपत्यसुख हवे असेल तर तिने स्वजातीतील मुलांना दत्तक घ्यावे. जर ब्रम्हचर्य जीवन जगण्यास ती स्वतःला असमर्थ मानत असेल तर नियोग–प्रथेद्वारे अपत्य प्राप्ती करून घेवू शकते. (वी..एन. सिंह, जन्मेजय सिंह, 2013, पृष्ठ 87) अशा प्रकारे विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन देण्याचा तत्कालीन प्रयत्न स्वामीजींचा होता.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने स्त्रियांच्या अधिकारासाठी चळवळ उभारली होती. बालविवाह, वृद्ध विवाहाची आर्य समाजाने भरपूर निंदा केली, स्त्रियांनी घराबाहेर पडावे, शिक्षण घ्यावे यासाठी मात्र सतत प्रयत्न करण्यात आले. बालविवाहावर बंदी आणण्यासाठी 'शारदा ॲक्ट' पारित करण्यात आला होता, ज्याचे श्रेय आर्य समाजाला जाते. त्यामुळे स्त्रियांच्या सन्मानात वाढ झाली, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही पुनर्विवाहाचा अधिकार आहे हे आर्य समाजाने समाजाला मान्य करायला लावले. आर्य समाजाने अनेक वाईट प्रथांचा विरोध करीत स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, बालविवाहाला विरोध इत्यादी स्त्री विषयक सुधारणा घडवून आणल्या.

**स्वामी विवेकानंदः**

स्वामी विवेकानंद शास्त्रामध्ये वर्णन केलेल्या स्त्रियांच्या प्रती मानसन्मान, आदर्श आणि मूल्यांच्या बाबींचे समर्थन करतात. स्त्री–पुरुष लिंगभेदाला ते अमान्य करतात, स्त्री–पुरुषांच्या आत्म्यामध्ये काही भेद नसतो तर लिंगभेद का करायचा, त्यांच्यात बाह्य भेद असले तरी स्वरूप मात्र एकच आहे असे स्वामी म्हणतात. स्त्रियांच्या उद्धारानेच देशाचा उद्धार होईल असे त्यांचे ठाम मत होते. पुरुष शरीराने सशक्त आहेत आणि स्त्रिया दुर्बल आहेत असे ते अजिबात मानत नसत. स्त्री सुद्धा तेवढीच साहसी आणि सशक्त आहे, तिला दुर्बल समजणे हा तिच्यावर अन्याय आहे असे त्यांचे मत होते. स्त्रियांना वेदाभ्यास करण्याचा पूर्ण अधिकार आहे, त्यांना सक्षम, कार्यप्रवण आणि योग्य बनविणे अत्यावश्यक आहे कारण देशाची प्रगती याच गोष्टीवर अवलंबून आहे कि स्त्री आणि पुरुष समान आहेत. स्त्री–पुरुष समानतेची भावना देशाला आर्थिक, सामाजिक उन्नतीसाठी अग्रेसर करते असे त्यांचे मत होते.

स्वामी विवेकानंद स्त्रियांच्या शिक्षणाला अत्यंत महत्वपूर्ण स्थान देतात. गृह्कार्यासोबतच विज्ञान, शिल्प, विणकाम, भरतकाम हे विषय स्त्रियांनी अवश्य शिकावे. धार्मिक पुस्तकाच्या अध्ययनामुळेच स्त्रियांच्या आत्मबळात वाढ होते, स्त्रियांच्या शिक्षणासाठी ब्रम्हचारी शिक्षकांना नियुक्त करावे आणि प्रशिक्षित करावे या मताचे ते होते. पुरुषांनी स्त्रियांना गुलाम बनवू नये उलट त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलावी जेणेकरून त्या आत्मनिर्भर होतील. विवेकानंदांच्या मते संघमित्रा, लीला, अहिल्याबाई, मीराबाई या आधुनिक स्त्रियांची परंपरा पुढे चालविली पाहिजे. शिक्षित स्त्रीच्या पोटी जन्माला येणारी संतान देशाचे भविष्य उज्ज्वल बनविते. त्यांनी बालविवाह निषेध आणि विधवा विवाहामुळे समाजव्यवस्थेत सुधारणा होवू शकते या मताचे खंडन केले. केवळ शिक्षणामुळे स्त्रिया विवेकी होवू शकतात असे त्यांचे म्हणणे होते.

विवेकानंदानी भगवान बुद्धांच्या विचारांचे उदात्तीकरण केले कि, बुद्धांनी भिखुसंघात स्त्रियांना पुरुषांच्या समान संधी दिली होती. ते म्हणतात भारतात स्त्री आणि पुरुष असा भेद का केला जातो? अनेक पिढ्यांपासून स्त्रियांना सतत दाबून आणि कुचलुन ठेवण्यात आले त्यामुळे समाजाचा पूर्ण विकास झाला नाही. त्या पुरुषांच्या तुलनेत कुठेच कमी नाहीत म्हणून पुरुषांनी त्यांना समान संधी द्यावी, या मताचे ते होते. विवेकानंदानी बालविवाहालाही विरोध केला होता परंतु त्यांचा मुख्यत्ः भर स्त्रियांच्या शिक्षणावर होता. त्यांच्या मते शिक्षणामुळेच त्यांच्यात आत्मबळ येईल आणि त्या आत्मरक्षा करू शकतील.

महादेव गोविंद रानडेः महादेव गोविंद रानडे महाराष्ट्रातील संत, ख्रिश्चन लेखक, राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन इत्यादी समाजसुधाराकांमुळे खूप प्रभावित होते. केशवचंद्र सेन यांनी 1867 मध्ये स्थापन केलेल्या 'प्रार्थना समाज' चे ते सदस्य होते, परिवर्तनाचे वारे वाहत होते, अशा समाजात त्यांचा उदय झाला. ब्राम्हण समाजाने स्त्रियांना गुलाम बनविले होते, तिला या दास्यातून मुक्त केले पाहिजे या विचारांचे ते होते. त्यासाठी पुनर्जागरण चळवळ त्यांनी उभारली होती. एक न्यायाधीश या नात्याने समाज उत्थान, समाजकल्याण आणि सामाजिक प्रगतीचा ध्यास त्यांनी घेतला होता. सामाजिक कुप्रथा आणि अंध रूढी परंपराचा ते धिक्कार करीत असत 1866 मध्ये विधवा विवाह संघाची स्थापना केली गेली, त्याचे सदस्य रानडे बनले. विधवा पुनर्विवाहाचे ते समर्थक होते. जुन्या प्रथा परंपरांचे पुर्नजीवन करण्याने समाजाचे कधीच भले होणार नाही. जेंव्हा आपले राजकीय अधिकार तुलनेत कमकुवत असतात तेंव्हा सामाजिक व्यवस्था सुद्धा चांगली बनू शकत नाही. स्त्रियांचे उत्पिडन होत असताना सत्ताधारी मूकदर्शक बनतात, त्यांच्यासाठी स्त्रियांचा अपमान एक गंभीर बाब नसते. तिला मारले जावो, कापले जावो, सत्तेवरील लोकांना काहीच फरक पडत नाही. सत्ता फक्त आश्वासन देत असते. गणतंत्र देशात सध्या स्त्रीया सुरक्षित नाहीत अशा समाजात सामाजिक सुधारणा करणे कसे शक्य आहे? असे मत ते मांडतात. बालविवाहाला ते प्रखर विरोध करतात आणि विधवा विवाहाचे समर्थन करतात. 1891 मध्ये त्यांनी विधवा पुनर्विवाह समितीचे अनेक सभासद बनविले. रानडे यांनी 1875 मध्ये विधवा गृहाची स्थापना केली होती, स्त्रियांच्या शिक्षणाला सुद्धा त्यांनी महत्वाचे स्थान दिले.

प्रार्थना समाजाच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध, स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन, स्त्रियांना त्यांचे सामाजिक अधिकार प्राप्त करून देणे, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे, अंधविश्वास आणि रूढीवादी परंपरांना समाप्त करणे इत्यादी कार्य न्यायमूर्ती रानडे यांनी केले.

**महात्मा ज्योतिबा फुलेः**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणाच्या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले आहे. स्त्रियांच्या अधोगतीसाठी त्यांचे अज्ञानच कारणीभूत आहे, हे त्यांना लक्षात आले होते. दलित, वंचित बहुजनांसाठी, स्त्रियांसाठी समाजसुधारणेचा भक्कम पाया तयार करण्याऱ्या अग्रगण्य समाज सुधारकांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा सिंहाचा वाटा आहे. तत्कालीन कठोर सामाजिक बंधनांना झुगारून त्यांनी स्त्रीयांच्या उत्थानासाठी अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे ब्रिटीश शासनाला गुडघे टेकावे लागले.

म. ज्योतिबा फुलेंचा जन्म त्या काळात झाला जेव्हा शिक्षणाचे अधिकार केवळ ब्राम्हणांना होते. त्यामुळे इतर सामाजिक समस्यांसोबत शिक्षणाचा प्रचार प्रसार हा महत्वाचा प्रश्न फुल्यांना भेडसावत होता. तत्कालीन ब्रिटीश सरकारने 1821 मध्ये पुण्यात संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली होती. 1825 मध्ये मुंबई येथे शासकीय जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात प्राथमिक शाळा सुरु केल्या गेल्या. 1840 मध्ये शिक्षण बोर्डाची स्थापना करण्यात आली तरीही ब्राम्हणांची हि धारणा होती कि शिक्षण हे दलित, वंचित आणि स्त्रियांसाठी अजिबात नाही. परंतु महात्मा फुल्यांनी कटट्रतावादी ब्राम्हणांची हि मानसिकता ओळखून स्त्रिया, दलित, वंचित, शुद्र लोकांपर्यंत शिक्षणाचा प्रचार व प्रसार कसा करता येईल यावर भर दिला. त्यांनी लिहिलेल्या साहित्यामधूनही त्यांनी शूद्रांना व स्त्रियांना

शिक्षणाचे किती महत्व आहे हे समजावून दिले. तृतीय रत्न, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी ग्रंथांमधून त्यांनी आपले विचार मांडले.

महात्मा फुल्यांचा जिवलग मित्र सदाशिव बल्लाळ गोवंडे यांची बदली अहमदनगर च्या जज कार्यालयात झाली आणि तिथे फुल्यांनी पाहिले कि स्त्रियांच्या शिक्षणाचे कार्य अहमदनगर येथे मोठ्याा जोमाने सुरु झालेले आहे. तिथे कु. फर्हाट या महिला शिक्षिकेने त्यांना सांगितले कि येथील सामान्य लोक स्त्रियांच्या शिक्षणामध्ये अजिबात रुची घेत नाहीत तरीही हे कार्य आम्ही करीत आहोत. (वी. एन. सिंह, जन्मेजय सिंह, 2013, पृष्ठ 101) या प्रसंगामुळे प्रेरणा घेवून पुण्यात सुद्धा असे कार्य करण्याचा निर्धार म. फुल्यांनी केला.

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी 1848 मध्ये दलित मुलींसाठी भिडेवाड्याात पहिली शाळा काढली. 03 जुलै, 1851 मध्ये शुद्र आणि अस्पृश्य मुलींसाठी शाळा काढली. अण्णासाहेब, वासुदेव चिपळूणकर यांच्या बुधवारपेठ मधील वाड्याात ही शाळा सुरु करण्यात आली. पुढे 17 सप्टेंबर 1851 मध्ये रास्तापेठेमध्ये अजून एका शाळेची स्थापना केली. आधी लोकांनी या शाळांमध्ये मुलींना पाठवण्यावर बराच विरोध केला होता. नंतर काही सुधारणावादी ब्राम्हण लोकांनी त्यांच्या मुलींना शाळेत पाठवणे सुरु केले.

1873 मध्ये ज्योतिबा फुल्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून स्त्री–पुरुष समतेचा फुल्यांनी जोरदार पुरस्कार केला. स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, बाल विवाह प्रतिबंध, कुमारिकांचे, परित्यक्ता यांचे प्रसूतिगृह, अनाथालय इत्यादी कार्य केले. 1860 मध्ये पुणे आणि पुण्याजवळील क्षेत्रात अनेक विधवा पुनर्विवाह घडून आणले. मुख्यतः यामध्ये ब्राम्हण विधवांची संख्याच जास्त होती.

सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत खडतर परीस्थितीला तोंड देत शिक्षण घेतले आणि महात्मा फुल्यांच्या प्रेरणेने त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका झाल्या. त्यांनी तत्कालीन कट्टर ब्राम्हण समाजाचे अनेक अत्याचार सहन करून मुलींना शिक्षित करण्याचे कार्य महात्मा फुल्यांच्या सोबतीने अविरतपणे केले. अनाथांची माय आणि कुमारीका व विधवांची प्रसूती करणाऱ्या सावित्रीबाई फुले या सामाजिक कार्यात अग्रेसर होत्या. त्यांच्या कार्याचे फलित म्हणूनच आज सर्व मुलीना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

स्त्री–पुरुष समतेचा विचार डॉ. बाबासाहेब आम्बेडकरांपुर्वी महात्मा फुल्यांनी मांडला. स्त्रीयांशिवाय पुरुषांच्या आयुष्याला महत्व नाही. स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्यांची गुलामगिरीतून सुटका होईल हा त्यांचा क्रांतिकारी विचार स्त्रियांच्या इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची स्त्रियांच्या शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी अत्यंत आश्वासक होती. स्त्रियांच्या प्रगतीचा दरवाजा शिक्षणाच्या वाटेनेच उघडता येईल हे त्यांना पक्के ठाऊक होते, म्हणून त्यांनी एकोणीसाव्या शतकात 1848 मध्ये महार, मांग यांच्या मुलींसाठी पहिली शाळा काढली. 1851 मध्ये उच्चवर्गीय मुलींसाठी दुसरी शाळा काढली त्यामुळे स्त्री मुक्तीचे कार्य सुरु झाले. धर्मशास्त्र, रूढी–परंपरांना फाटा देत शिक्षणासारखे प्रभावी शस्त्र महात्मा फुल्यांनी स्त्रियांना वापरायला शिकविले. अस्पृश्य स्त्री ला अक्षरओळख करून देवून विचार प्रवृत्त करण्याचा हा सफल प्रयोग होता. समाजव्यवस्थेच्या मूळ गाभ्यालाच नख लावून, स्त्रियांना मुक्त करण्याचा हा यशस्वी मार्ग फुल्यांनी दिला. स्त्रियांनी दुर्बल, दुबळे राहू नये म्हणून तिच्यातील भय, न्यूनगंड दूर व्हावा, ती आत्मनिर्भर व्हावी म्हणून व्यावसायिक प्रशिक्षणाची आवश्यकता आणि सोय करून द्यावी अशी मागणी फुल्यांनी तत्कालीन सरकारकडे केली. महात्मा फुल्यांनी शुद्र, अस्पृश्य महिलांच्या शिक्षणासाठी अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या या कार्याची दाखल घेऊन ब्रिटीश शासनाने त्यांची शिक्षण मंडळाची मागणी मान्य केली. आधुनिक भारताच्या निर्माण प्रक्रियेत महात्मा फुल्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

**संत कबीरः**

कबीराची वाणी समाजवास्तवाचे भेदक वर्णन करणारी होती. त्यांचे काव्य ह्रदयस्पर्शी, मर्मभेदी होते, कबीरांच्या लेखणीतून, वाणीतून जीवनाचे अंतरंग उलगडले आहेत. जात, पंथ, धर्म, लिंग या भेदापलीकडे कबिरांची लेखणी प्रहार करीत होती. असहिष्णुता, विषमता, रुढीप्रीयता यावर त्यांनी हल्ला चढविला होता. महिलांना दुय्यम वागणूक आणि त्यांच्यावरील अन्यायाविरुद्ध कबीरांनी आपल्या लेखणीतून आसूड ओढले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरः**

आजच्या आधुनिक युगात पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडातून मुक्त होवून स्त्री नवनवीन आव्हाने पेलत आहे. तिची स्थिती आमुलाग्र बदललेली आहे. दयनीय, केविलवाणी, मनुस्मृतीच्या जोखडात अडकलेली स्त्री केंव्हाच नष्ट झाली आहे. त्या ऐवजी मोर्चे, सत्याग्रह, आंदोलने करून स्वतःच्या हक्कासाठी लढणारी खंबीर स्त्री आज भारतात वावरते आहे. अन्याय अत्याचाराला प्रतिकार करीत, क्रांतीची गीते ती गाते आहे. चूल आणि मूल संकल्पनेला तिने केंव्हाच मागे टाकले आहे. 21 व्या शतकातील स्त्री परिवर्तासाठी सुसज्ज आहे. परंतु या मागे जी प्रेरणा आहे ती केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातून मिळालेली आहे. स्त्रियांना ओजस्वी, धगधगता तेजस्वी निखारा बनविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाने आणि भाषणांनी केले. त्यांच्या कार्याने प्रेरणा घेवून आज अनेक स्त्रिया आधुनिक काळात इतर स्त्रियांसाठी कार्य करतांना दिसत आहेत.

संपूर्ण भारतभर आज विविध संघटनांच्या माध्यमातून स्त्रियांना कार्यकर्तुत्व दाखविण्याची संधी प्राप्त झाली आहे. शतकानुशतके ज्यांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्याच आता चळवळीचा नवा चेहरा बनून पुढे आल्या आहेत. आज समाजात स्त्रियांचे स्थान आमुलाग्र बदलले आहे. त्या आता परंपरेला चिकटून राहिल्या नाहीत. ज्या स्त्रियांनी हुंड्यामुळे वाताहत सहन केली त्याच आज हुंडाबळी समस्येच्या विरोधात कंबर कसून उभ्या आहेत. शिक्षणाचे महत्व त्यांना कळले आहे. पितृसत्ताक परंपरेला

केंव्हाच फाटा देत मुलींना शिकविने आणि उच्चशिक्षण देणे त्यांनी आपली प्राथमिकता बनविली आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' ही ओळ बाबासाहेबांना खूपच आवडायची. त्यांच्या मते खरोखरच जर समाजाला प्रगतीपथावर न्यायचे असेल. घरातील स्त्री ही समाजात पुढे आली पाहिजे. समाजकार्यात स्त्रियांनी हिरीरीने भाग घ्यायला पाहिजे.

मुलींना शिक्षणासाठी बाहेर पडू दिले जात नव्हते कारण घरातील कामे व लहान भावंडाना कोण सांभाळेल. हा प्रश्न प्रामुख्याने ग्रामीण भागात निर्माण होत होता. आई–वडील दोघेही पोटाच्या मागे लागले असतील तर मुलींना घराचा भार उचलावा लागे परंतु आता ही विचारसरणी बदलली आहे. खेड्यातील मुलींना वसतीगृहात राहून चांगले शिक्षण, वह्या, पुस्तके, जेवण सर्व मिळते हे पालकांना समजले आणि त्यांनी मुलींना शिक्षणासाठी बिनदिक्कत शहरात पाठवायला सुरुवात केली. खेड्यात एकदाचे घरात शौचालय, वीज, पंखा, पाणी या वस्तू नसतात परंतू शहरात वसतीगृहात या वस्तू असतात त्यामुळे मुलींना शिक्षणावर लक्ष देणे सोपे जाते. (संपादक, एस. एम. मायकेल, 2008, पृष्ठ 208).

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांमध्ये विद्रोह आणि स्वाभिमान जागविला, त्यांना त्यांच्या अधिकारांप्रती जागृत केले. शिक्षण आणि स्वच्छतेचा संदेश दिला. स्वतःचे अस्तित्व बनवाल तर टिकाल अशी चेतना त्यांच्यात निर्माण केली. त्यांना अपेक्षित समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सर्वाना समान न्याय होता. त्यांनी कधीही स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत कोणत्याच परीने कमी लेखले नाही उलटपक्षी स्त्री–पुरुष असा भेदच मी मान्य करीत नाही, असे ते म्हणायचे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांच्या मुक्तीचे चाहते होते. त्यांनी ब्राम्हणी पोथी–पुराण, शास्त्रावर आधारित हिंदू समाजातील, स्पृश्य, अस्पृश्यतेवर आधारित जातीवाद–वर्णवादावर आधारित तिरस्कार, घृणा, द्वेष, उच्च–निच्च, पवित्र–अपवित्र अशा सर्व गुलामगिरीतून स्त्रियांची मुक्तता केली. (वी. एन. सिंह, जन्मेजय सिंह, 2013, पृष्ठ 345).

**समारोपः**

युगानुयुगे गुलामगिरीच्या जोखडात अडकलेल्या स्त्री ला मुक्त करून तिच्या हातात संविधानाचे शस्त्र देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेबांनी केले. देशाचा कायदा जेंव्हा स्त्रीला बरोबरीचे स्थान देतो तेंव्हा बाकी सर्व बंधने आपोआप झुगारून टाकली जातात. आजची भारतीय स्त्री बाबासाहेबांच्या विचारांचा परिपाक आहे. तिची डोळ्यात भरणारी प्रगती, आकाशात झेपावणारी अस्मिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत जाज्वल्य अभिमानाने निर्माण झाली आहे. कायदेशीर अधिकारांनी ती शस्त्रसज्ज आहे तर स्वतःच्या घटनादत्त अधिकारांनी व कर्तव्यांनी सुसज्ज आहे. जेवढी ती स्वतंत्र आहे तेवढीच ती खंबीर आणि कर्तव्यदक्ष आहे. सामाजिक कार्यात तिचा सहभाग जसा दैदिप्यमान आहे, तसेच भारतीय कुटुंब व्यवस्थेला टिकवून ठेवण्याची तिची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. शिक्षण, स्वातंत्र्य, कर्तव्य कठोरता, बाणेदारपणा, स्त्री शक्तीचा अभिमान तर तिच्या वागण्यातून जाणवतोच आहे परंतु आपली प्राचीन अस्मिताही तिने परत प्राप्त केली आहे. भगवान बुद्धांच्या काळातील महिलांची अतिउच्च प्रतिष्ठा तिने परत प्राप्त केली आहे. आधुनिक काळात स्त्रियांच्या पंखाना एवढे बळ प्राप्त झाले आहे कि आता हे आकाश तिला भरारी घेण्यास अपुरे पडत आहे.

**संदर्भ ग्रंथः**


1. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक लेखन, महेंद्र गायकवाड, संघर्ष प्रकाशन नागपूर.*
2. *नारीवाद, वी. एन. सिंह, जनमेजय सिंह, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली.*
3. *आधुनिक भारतातील दलितः दृष्टीकोन आणि मुल्ये, संपादकः एस.एम. मायकेल, अनुवादः विद्या भाके, डायमंड पब्लिकेशन, पुणे.*
4. *भारत मे सामाजिक आंदोलन, घनश्याम शाह, अनुवादः हरिकृष्ण रावत, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली.*
5. *भारतीय नारीः संघर्ष और मुक्ती, वृंदा कारात, अनुवादः उषा चौहान, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली.*
6. *अनुसूचित जाती में महिला उत्पिडन, डॉ. मंजुलता, अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली.*
7. *समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, अनुवादः मंजुषा गोसावी, संपादकः रेहाना घडीयाली, डायमंड पब्लिकेशन, पुणे.*